३३ कॅबिनेट...६ राज्यमंत्री...४ महिला...

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ५० • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.१६ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

नव्या चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी

नागपुरात ३९ जणांचा शपथविधी; भुजबळ,मुनगंटीवारांना डच्चू

भारतीय रिपब्लिकन पक्षाला मंत्रीपद न मिळाल्यामुळे नाराज : रामदास आठवले



नागपूर (वृत्तसंस्था)–अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळाचा बहुप्रतिक्षित विस्तार आज नागपुरातील राजभवनात झाला. भाजपच्या १९, शिवसेनेच्या ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नऊ अशा ३९ आमदारांना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ देवविली. मंत्रिमंडळात २५ नवे चेहरे असून आधीच्या मंत्रिमंडळातील छगन भुजबळ, दीपक केसरकर यांच्यासह ११ जणांना डच्चू देण्यात आला आहे. खातेवाटप दोन ते तीन दिवसांत जाहीर करणार असल्याचे शपथविधीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत फडणवीस यांनी जाहीर केले. सोमवारपासून (ता. १६) हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर १० दिवसानंतर मंत्रिमंडळ विस्तार झाला आहे. मंत्रीमंडळाच्या विस्ताराचा मुहूर्त तीनदा टळल्यानंतर आज मुहूर्त साधला. आज शपथ घेतलेल्या ३९ मंत्र्यांपैकी ३३ कॅबिनेट मंत्री आणि सहा राज्यमंत्री आहेत. मंत्रिमंडळात चार महिलांचा समावेश असून त्यात दोन मंत्री आणि दोन राज्यमंत्री आहेत. भविष्यात आणखी काही महिलांना स्थान देऊ, असे फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.दुपारी चार वाजता राजभवनातील हिरवळीवर मंत्र्यांच्या कार्यकर्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत शपथविधी सोहळ्याला प्रारंभ झाला. सर्वप्रथम भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंशेखर बावनमुळे, दुसऱ्या क्रमांकावर राधाकृष्ण विखे पाटील आणि तिसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादीच्या हसन मुश्रीफ यांनी शपथ घेतली. मंत्रिमंडळात २५ नवे चेहरे आहेत. सर्वांनाच संधी देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. मंत्रिमंडळात स्थान न मिळालेल्या नेत्यांपैकी काही अपवाद वगळता अनेक जणांना त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे संधी न मिळाल्याची चर्चा आहे. एकूण २१ जिल्ह्यांना मंत्रिपद मिळाले असून १५ जिल्ह्यांची ही संधी हुकली आहे. पुणे आणि सातारा या दोन जिल्ह्यांना सर्वाधिक चार मंत्रिपदे मिळाली आहेत. एकही मंत्रिपद न दिल्याबद्दल आणि शपथविधीलाही निमंत्रण न दिल्याबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) नेते रामदास आठवले यांनी नाराजी व्यक्त केली. दरम्यान, हे सरकार शेतकरीविरोधी असून खुनी असल्याने महाविकास आघाडीने आजच्या चहापानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतल्याचे विधान परिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी येथे केले.

कोणी घेतली मंत्रिपदाची शपथ ?

भाजप: चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, गणेश नाईक, मंगलप्रभात लोडा, जयकुमार रायल, पंकजा मुंडे, अतुल सावे, अशोक उईके, आशिष शेलार, संजय सावकारे, नितेश राणे, आकाश फुंडकर, माधुरी मिसाळ राज्यमंत्री पंकज भोयर राज्यमंत्री मेघना बोर्डीकर राज्यमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

शिवसेना– गुलाबराव पाटील, दादा भुसे, संजय राठोड, उदय सामंत, शंभूराज देसाई, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर, आशीष जैस्वाल– राज्यमंत्री योगेश कदम – राज्यमंत्री

राष्ट्रवादी–हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, दत्तात्रय भरणे, आदिती तटकरे, माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवळ मकरंद, जाधव बाबासाहेब पाटील, इद्रनील नाईक.



परभणीत आंदोलनानंतर तणाव,न्यायालयीन कोठडीत सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू





परभणी । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेच्या निषेधार्थ झालेल्या आंदोलनानंतर न्यायालयीन कोठडीत ठेवलेल्या सोमनाथ सूर्यवंशी (वय ३५) याचा मृत्यू झाल्याने जिल्ह्यात तणाव निर्माण झाला आहे. सोमनाथ सूर्यवंशी याला न्यायालयीन कोठडीत असताना प्रकृती बिघडल्याने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रविवारी (१५ डिसेंबर) सकाळी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर परभणी शहरात आणि जिल्ह्यात तणावपूर्ण शांतता निर्माण झाली असून, प्रशासनाने ठिकठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ ठेवलेल्या संविधान प्रतिकृतीची मंगळवारी एका माथेफिरूने विटंबना केली होती. या घटनेच्या निषेधार्थ बुधवारी परभणीसह जिल्ह्यात बंद पुकारण्यात आला. यावेळी आंदोलनाचा हिंसक प्रकार घडला, ज्यात दगडफेक व जाळपोळ झाली. पोलीसांनी याप्रकरणी ५० जणांना ताब्यात घेऊन न्यायालयीन कोठडीत ठेवले होते. त्यापैकी सूर्यवंशी याला शनिवारी प्रकृती अस्वास्थ्य जाणवल्याने रुग्णालयात हलवले गेले, मात्र उपचाराआधीच त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. सूर्यवंशी यांच्या मृत्यूमुळे जिल्ह्यात तणाव वाढल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. परभणी बस आगारातून गंगाखेडसह इतर मार्गांवरील बसेस बंद करण्यात आल्या असून, जनजीवनावर त्याचा परिणाम झाला आहे. पुढील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रशासनाकडून खबरदारीचे उपाय सुरू आहेत.

रामदास आठवले यांचा घटनास्थळी दौरा
गुप्तचर विभागाकडून चौकशीची मागणी

परभणी । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळील संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेच्या निषेधार्थ केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी शनिवारी (दि. १४) परभणीला भेट देत संपूर्ण घटनेची गुप्तचर विभागामार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली. संविधानाचा अवमान करणाऱ्या कोणालाही भारतात राहण्याचा अधिकार नाही, असे ठाम मत व्यक्त करत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवलेल्या संविधानाच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत संविधानाचा अपमान सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट केले.परभणी दौऱ्यात आठवले यांनी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, प्रभारी पोलीस अधीक्षक यशवंत काळे व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत शासकीय विश्रामगृहावर बैठक घेतली. त्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी आरोपी सोपान पवार याच्या मागील कारणांची व घटनेत इतर कोणी सहभागी आहे का, याची तपासणी करण्याचे निर्देश दिले. आठवले यांनी आरोपीवर ऍट्रॉसिटीसह गंभीर गुन्हे दाखल असल्याचे सांगितले. त्याच्यावर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तेथे सुटका झाल्यानंतर गुप्तचर विभागाकडून चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. या प्रकरणातील जबर मारहाणीच्या तक्रारींचीही चौकशी करून संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या घटनेत आंदोलनादरम्यान मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पोलिसांनी ३०० जणांवर गुन्हे दाखल केले असून ४२ जणांना अटक केली आहे. यातील १० जणांना जामीन मिळाला आहे. निरपराध विद्यार्थ्यांना यातून सुटका देण्याचे आवाहन करत, दाखल गुन्हे मागे घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटण्याचे आश्वासन आठवले यांनी दिले. परभणीतील तणावपूर्ण परिस्थितीत प्रशासन सतर्क असून पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.



तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–जगप्रसिद्ध तबलावादक आणि पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन झाले. सोमवारी सकाळी त्यांच्या कुटुंबीयांनी याला दुजोरा दिला. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार हुसेन हे इडिओपॅथिक पल्मोनरी फायब्रोसिसने ग्रस्त होते.गेल्या दोन आठवड्यांपासून ते सॅन फ्रान्सिस्को येथील रुग्णालयात दाखल असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले. तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.झाकीर यांचा जन्म ९ मार्च १९५१ रोजी मुंबईत झाला. उस्ताद झाकीर हुसेन यांना १९८८ मध्ये पद्मश्री, २००२ मध्ये पद्मभूषण आणि २०२३ मध्ये पद्मविभूषणने सन्मानित करण्यात आले.त्यांच्या वडिलांचे नाव उस्ताद अल्लारखा कुरेशी आणि आईचे नाव बावी बेगम होते. झाकीर यांचे वडील अल्लारखा हेही तबलावादक होते. झाकीर हुसेन यांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील माहीम येथील सेंट मायकल स्कूलमधून झाले.मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून त्यांनी ग्रॅज्युएशन केले. हुसेन यांनी वयाच्या अवघ्या ११ व्या वर्षी अमेरिकेत पहिला कॉन्सर्ट केला होता. १९७३ मध्ये त्यांनी त्यांचा पहिला अल्बम 'लिव्हिंग इन द मटेरियल वर्ल्ड' लाँच केला.हुसेन यांना २००९ मध्ये पहिला ग्रॅमी पुरस्कार मिळाला होता. २०२४ मध्ये त्यांनी ३ वेगवेगळ्या अल्बमसाठी ३ ग्रॅमी जिंकले. अशा प्रकारे झाकीर हुसेन यांनी एकूण ४ ग्रॅमी पुरस्कार जिंकले.इडिओपॅथिक पल्मोनरी फायब्रोसिसमध्ये, फुप्फुसाच्या ऊतींचे नुकसान होते, ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होतो. श्वास लागणे आणि घशात कफ येणे ही त्याची सुरुवातीची लक्षणे आहेत. फुप्फुसाच्या ऊतींचे नुकसान झाल्यामुळे, पुरेसा ऑक्सिजन रक्तापर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे शरीरातील अवयवांपर्यंत ऑक्सिजन पोहोचण्यात अडचण येते आणि हळूहळू अवयवही काम करणे बंद करतात.



देवगड येथे भगवान दत्तात्रेयांचा जन्मसोहळा उत्साहात साजरा

लाखो भाविकांनी घेतले दर्शन



अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील तालुक्यातील देवगड येथे 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'अशा जयघोषासह पुष्पवृष्टी व शंखाचा निनाद करत नेवासा तालुक्यातील भू-लोकीचा स्वर्ग अशी ओळख असलेल्या गुरुदेव दत्तपीठ देवगड येथे शनिवारी सायंकाळी ६ वाजता भगवान दत्तात्रयांचा जन्म सोहळा गुरुवर्य महंत भास्करगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

दत्तजयंती महोत्सवाच्या कालावधीत लाखो भाविकांनी देवगड येथे हजेरी लावून भगवान दत्तात्रयांचे दर्शन घेतले.

दत्तजयंतीच्या दिवशी शनिवारी सायंकाळी ६ वाजता झालेल्या श्री दत्त जन्म सोहळ्याच्या प्रसंगी गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराजांच्या हस्ते भगवान दत्तात्रयांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. श्री दत्त जन्म सोहळ्याच्या प्रसंगी मंदिरासमोरील कीर्तन मंडपात पुष्पांनी सजविलेल्या व्यासपीठावर पाळणा ठेवण्यात आला होता. पाळण्यामध्ये भगवान दत्तात्रयांची मूर्ती ठेवण्यात आली होती. विधिवत पूजन झाल्यानंतर वेदमंत्राच्या जयघोष पुष्पवृष्टी करत भगवान दत्तात्रयांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी गुरुवर्य भास्करगिरी बाबा व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते पाळण्याची दोरी ओढण्यात आली. नेवासा येथील गायिका माधुरीताई कुलकर्णी यांनी दत्त जन्माचा पाळणा म्हटला त्यांना यांनी त्यांना साथ दिली. दत्तजयंती महोत्सवाच्या कालावधीत लाखो भाविकांनी देवगड येथे हजेरी लावून भगवान दत्तात्रयांचे दर्शन घेतले.

जोर्वे गटात इच्छुकांचे गुडघ्याला बाशिंग

विखे-थोरात कार्यकर्त्यांची होणार सरळ-सरळ लढत

अहिल्यानगर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील विधानसभा निवडणुका पाहता- पाहता सरल्या अन् आता नगरपालिकेसह जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. इच्छुक कार्यकर्त्यांची पांढर्या पेहरावामधील गर्दी दाटलेली दिसत आहे.

ग्रामीण भागातील मिनी मंत्रालय समजल्या जाणार्या जिल्हा परिषदेसह पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारांची चाचपणी सुरू झाली आहे. आरक्षण कुठलेही निघो, आपण मात्र, मुख्य प्रवाहात असल्याचे जाणीव करून देण्यासाठी इच्छुक कार्यकर्ते धडपड करीत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

संगमनेर तालुक्यातील व शिर्डी विधानसभा मतदारसंघातील माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचा बालेकिल्ला असलेला जोर्वे जिल्हा परिषद गटात आरक्षणाचा विचार न करता काँग्रेस व भाजप, रिपाईंसह विविध संघटनांकडून इच्छुकांची चाचपणी सुरू झाली आहे. हा गट थोरातांचे माहेर घर तर विखे पाटील यांचा हा विधानसभा मतदारसंघ असल्याने येथे विखे- थोरात यांच्या कार्यकर्त्यांची सरळ-सरळ लढत होणार आहे. दोन्ही गटांकडून विविध नावांची जोरदार चर्चा होत आहे. येथील लढतीकडे जिल्ह्याचे लक्ष लागेल, अशी चर्चा झडत आहे.

जोर्वे जिल्हा परिषद गट संगमनेर तालुक्यातील पूर्व भागातील महत्त्वाचा आहे. या गटातील निम्मी गावे बाळासाहेब थोरात यांच्या मतदारसंघातीलय तर निम्मी गावे मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मतदारसंघातील आहेत. विखे- थोरात या दोन्ही नेत्यांचा मोठा प्रभाव या गटांवर आहे. या भागात काही वर्षांपासून विखे व थोरात परिवाराशी येथील लोकांची नाळ जुळली आहे. मंत्री विखे यांच्या कार्यकर्त्यांचा येथील संच मोठा प्रमाणात आहे तर स्वतः चे गाव, विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून, जुन्या ऋणानुबंधामुळे माजी महसूलमंत्री थोरात यांचा या परिसरात प्रभाव आहे. थोरात -विखे एकत्र असो अथवा नसो, २०१९ सालापर्यंत येथे निवडणुकांचे सोयीचे राजकारण दिसले, मात्र मागील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत विखे- थोरात काँग्रेस पक्षात असतानासुद्धा विखे यांनी जोर्वे गटात तर थोरात यांनी आश्वी गटात अपक्ष उमेदवार देवून, कार्यकर्त्यांची प्रतिष्ठा पणाला लावली होती, मात्र दोन्ही ठिकाणी अपक्षांची दाळ शिजली नाही, परंतू विरोधाची मात्र ठिणगी पडली. तेव्हापासून कुठलाही कार्यक्रम असो, एकमेकांवर टीका-



टीप्पणी होत राहिली राहिली आहे. विधानसभा निवडणुकीतही या दोन्ही नेत्यांनी एकमेकांविरोधात कंबर कसली. जोरदार संघर्ष झाला. अमोल खताळ यांच्या धणुष्य बाणाने विखे पिता - पुत्राने थोरात यांना घायाळ करीत अखेर विधानसभेत चितपट केले. आता लक्ष लागले आहे ते, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांद्वारे मिनी मंत्रालयात सत्ता मिळविण्याकडे. नेत्यांच्या बालेकिल्ल्यांपासून संपूर्ण जिल्ह्यात जोरदार रस्सीखेच होणार, यात तीळमात्र शंका नाही.

जोर्वे जिल्हा परिषद गट पाहिजे तसा सोयीस्कर नाही. विविध जाती- धर्माचे, सुशिक्षित व सधन मतदार येथे आहेत. ते राजकारणाविषयी जाणकार आहेत. बागयत भाग असतानासुद्धा विखे- थोरात यांच्या भोवती कार्यकर्त्यांचे मोठे वलय दिसत आहे. सहकाराच्या माध्यमातून दोन्ही नेत्यांनी आपले वर्चस्व निर्माण करून, कार्यकर्ते घडविले आहेत.

दोन्ही विधानसभांच्या सीमेवरील ही गावे आहेत. येथेय विकासात्मक कामे चढा-ओढीने होताना दिसतात. काही दिवसातच होणार्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी करण्यासाठी येथील अनेक इच्छुकांनी आत्ताच गुडघ्याला बाशींग बांधले आहे, मात्र वरिष्ठांचा आशीर्वाद कुणाला मिळेल, हे सांगता येत नाही.

थोरात गटाकडून संगमनेर दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख, थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजित थोरात, सुरेश थोरात, विनायक थोरात, विखे गटाचे मालुंजेगावचे सरपंच संदीप घुगे, जोर्वे येथील गोकूळ दिघे, भाजप जिल्हा सचिव सचिन शिंदे, शिवाजी कोल्हे, अशोक तळेकर, दिलीप इंगळे, याव्यतिरिक्त रिपाईंचे आशिष शेळके, सरूनाथ उंबरकर या इच्छुकांनी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे. आपापल्या परीने ते फिल्डींग लावताना दिसत आहेत, मात्र या परिसरातील लोकांच्या चर्चेतून थोरात- विखे या दोन्ही नेत्यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

जिल्हा परिषदेच्या जोर्वे गटातील अंभोरे गण ओपन अथवा प्रवर्ग पुरुष निघाल्यास भास्कर खेमनर (थोरात गट) तर संदीप घुगे (मालुंजे, विखे गट) या दोन आक्रमक माजी सरपंचांमध्ये लढत होणार असल्याचे निश्चित आहे, अशी चर्चा या परिसरात झडत असली तरी, या गणात धनगर समाज फॅक्टरमुळे व नाते-गोत्यांच्या राजकारणामुळे बुवाजी पुणेकर यांच्या वलयाच्या माध्यमातून ओझर सोसायटीचे माजी चेअरमन राहुल खेमनर यांनीही तयारी सुरु केल्याचे चित्र दिसत आहे. डिग्रसचे सरपंच अशोक खेमनर हे सुध्दा विखे गटाकडून इच्छुक आहेत. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या निर्णयावर सर्व काही अवलंबून राहणार आहे. महायुतीच्या मोठ्या यशामुळे येथे इच्छुकांची संख्या वाढत आहे. दुसरीकडे थोरात गटाकडून रणजितसिंह देशमुख यांच्या नावाला तरुणांची पसंती असल्याचे बोलले जात आहे

अवकाळीचा ९ हजार शेतकऱ्यांना दणका आठ महिन्यात ३ हजार ८९७ क्षेत्रावर नुकसान

अहिल्यानगर । प्रतिनिधी

जिल्ह्यात यंदा एप्रिल महिन्यांपासून ते नोव्हेंबर या आठ महिन्याच्या काळात ८हजार ९२६ शेतकर्यांच्या ३हजार ८९७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झालेले आहे.

जिल्ह्यात चालूवर्षी अनेक ठिकाणी पावसाने दमदार ते अतिवृष्टी अशा पावसाने हजेरी लावली. विशेष करून जिल्ह्याच्या दक्षिण भागात त्याचे प्रमाण सर्वाधिक होते. यंदा एप्रिल महिन्यांच्या १८ तारखेपासून जिल्ह्यात सुरूवात झाली. या पावसामुळे नगर तालुक्यात, त्यानंतर मे महिन्यांच्या ६ आणि ७ तारखेला, तसेच २७, २८, २९ आणि ३१ तारखेला पाथर्डी, कर्जत, जामखेड, शेवगाव, कर्जत या तालुक्यात अवकाळी, वादळी वारे यामुळे पिकांचे नुकसान झाले. जून महिन्यांच्या ५,६,७आणि १६ तारखेला जामखेड आणि नेवासा तालुक्यात, त्यानंतर जुलैच्या २ आणि ४ तारखेला अकाले, शेवगाव, नेवासा, शेवगाव, कर्जत, नगर तालुक्यात वादळी वारे, ५आणि २६ ऑगस्टला जामखेड आणि संगमनेर तालुक्यात अतिवृष्टी व पूर, ९ ऑगस्टला अकोले तालुक्यात सततचा पाऊस, ६,९सप्टेंबरला अतिवृष्टी, पूर आणि सततच्या पावसामुळे श्रीगोंदा, अकोला, संगमनेर तालुक्यात ९, १०,११, १४, १७ ऑक्टोबरला अकोले, कोपरगाव, श्रीगोंदा, नगर, तसेच ४, ५, ७, ११ नाव्हेंबरला राहुरी, श्रीरामपूर, जामखेड, कर्जत याठिकाणी अवेळी पाऊस, ओढे, नाल्यातील पूराचे पाणी शेतात घुसल्याने शेतकर्यांचे नुकसान झालेले आहे.

याबाबतचे पंचनामे कृषी आणि महसूल विभागाने संयुक्तपणे केलेले असून भरपाईचा अहवाल शासनाला पाठवण्यात आला आहे. राज्य



सरकारच्यावतीने नुकसान भरपाई देतांना बाधित क्षेत्र २ हेक्टर मर्यादित व २ हेक्टरपेक्षा वाढीव क्षेत्रनूसार पंचानामे करण्यात येण्यात येतात. यात देखील ३३ टक्क्यांपेक्षा कमी आणि ३३ पेक्षा अधिक असणारे शेतकरी असे वर्गी करण्यात येवून जिरायत, बागायत क्षेत्रानूसार भरपाई देण्याची तरतूद आहे.

जिल्ह्यात सुमारे ९ हजार शेतकर्यांचे ३ हजार ८९७ हेक्टरवरील पिकांचे ४ कोटी ७७ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. तसेच भरपाईसाठीचा अहवाल तयार करून महसूल, कृषी आणि जिल्हा परिषदेच्या अधिकार्यांच्या संयुक्त सहीने सरकारला सादर करण्यात आला आहे. या अहवालानूसार राज्य सरकारकडून भरपाई मंजूर करून ती संबंधित शेतकर्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

राहुरीत १९ डिसेंबरला नरेंद्राचार्याजी महाराज यांचे पादुका दर्शन सोहळा

राहुरी । प्रतिनिधी

राहुरी :राहुरी शहरातील नगर- मनमाड मार्गालगत असलेल्या हिरोहोंडा शोरूम पाठीमागील भव्य पटांगणात दक्षिण पीठ नाणीजधामचे मठाधिपती जगतगुरु रामानंदाचार्य श्री. स्वामी नरेंद्राचार्याजी महाराज यांचे पादुका दर्शन व प्रवचन सोहळा गुरुवार दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वा. आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्ताने आज याठिकाणी ध्वजारोहण संपन्न झाले.

जगतगुरू स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या सिद्ध पादुका दर्शन व प्रवचन सोहळ्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील स्व स्वरूप संप्रदाय परिवाराकडून जय्यत तयारी सुरू असून यानिमित्ताने नानिजधाम संस्थानच्या वतीने सामाजिक उपक्रम, उपासक दीक्षा व अध्यात्मिक प्रवचन आदी विविध धार्मिक कार्यक मांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी भव्य-दिव्य मंडप उभारण्यात येत असून ठिकठिकाणी सोहळ्याचे बॅनर लावण्यात आले आहेत. जिल्ह्यात लाऊड स्पीकर व भाविकांच्यावतीने प्रचार-प्रसार करण्यात आला आहे.या प्रवचन सोहळ्यानिमित्त विधिवत पूजन होऊन ध्वजारोहण संपन्न झाले.



नेवासा फाटा येथील वाहतूक कोंडीला अतिक्रमणच जबाबदार

नेवासा । प्रतिनिधी

अहिल्यानगर - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नेवासा फाटा येथील आंबेडकर चौक आणि राजमुद्रा चौकात सततच वाहतुकीचा बोजवारा उडालेला आहे. वारंवार वाहतूक कोंडी होत असल्यामुळे वाहनधारकांसह व्यापाऱ्यांना या वाहतूक कोंडीचा प्रचंड त्रास सहन करण्याची वेळ आलेली आहे.

ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी दिवसभर वाहतूक पोलिसांचे मोठे हाल होत असून, या कोंडीतून रुग्णवाहिका आणि पोलिसांचे वाहनेही सुटले जात नाहीत. याचे मुख्य कारण महामार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा असलेले अतिक्रमण कारणीभूत असताना याकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे. येथे दिवसभर वाहतूक कोंडी आणि या कोंडीतून वाहनाच्या हॉर्नचा कर्णकर्कश आवाजामुळे व्यापाऱ्यांची डोकेदु:खी होत आहे. याकोंडीतून सुटका करण्यासाठी नेवासा फाटा येथील अतिक्रमण काढण्याची नितांत गरज आहे. जिल्हाधिकाऱ्यांनीच याकडे आता लक्ष घालण्याची मागणी जनतेतून केली जात आहे.

नेवासा फाटा येथे महामार्गाच्या रस्त्याच्या दुतर्फा मोठे अतिक्रमण करण्यात आलेले असल्यामुळे ही वाहतूक



कोंडीची समस्या वारंवार होत आहे. वाहतूक शाखेचे पोलीस दिवसभर वाहतूक नियंत्रण करताना दिसून येत असले तरी एका चौकातील कोंडी सुटली की, दुसऱ्या चौकात वाहतूक कोंडी होत असल्यामुळे यामध्ये प्रवाशांचे मोठे हाल होत आहे. जागतिक बँक प्रकल्प विभागाने याची दखल घेऊन वाहतूक कोंडीचा कायमस्वरुपी प्रश्न सोडविण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा असलेले अतिक्रमण काढून टाकण्याची गरज आहे

पंचायत समित्यांतही रंगणार पॉलिटिकल वॉर!

अहिल्यानगर । प्रतिनिधी

जिल्ह्यात महायुतीचे १० मतदारसंघात प्राबल्य वाढल्याने आता तालुका पंचायत समितीच्या सत्तेमध्येही मोठा फेरबदल पहायला मिळू शकतो, अशी चर्चा आहे. दरम्यान, विधानसभेचे वातावरण अजुनही गरम असल्याने या ठिकाणी नूतन आमदार हे आपल्या ताब्यात पंचायत समितीची सत्ता घेण्यासाठी प्रयत्न करणार आहेच मात्र पराभूत आमदारांचीही गणातील ताकद कमी नसल्याने या लढती लक्षवेधी ठरण्याचे संकेत आहेत.

जिल्ह्यात पंचायत समितीचे १५० गण आहेत. प्रत्येक तालुक्यात साधारणतः ४ ते ८गट तर ८ ते १६ गण आहेत. गटातील विजयी सदस्यांमधून जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडी होतात. तर पंचायत समितीच्या सदस्यांमधून सभापती व उपसभापती निवडले जातात. गेल्या पाच वर्षाचा आढावा घेतला तर २०१७ मध्ये झालेल्या पंचायत समितीच्या निवडणुकीत बहुतांशी पंचायत समिती ह्या आघाडीच्या ताब्यात होत्या. पंचायत समितीमध्ये २०१७आणि २०२० अशा दोन टप्प्यात अडीच अडीच वर्षाचे सभापती व उपसभापती आरक्षण निघाले होते. त्यानुसार निवडी करण्यात आलेल्या होत्या. तर, २०२९ नंतर बदललेल्या राजकीय समिकरणानंतर काही पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकताना दिसला.

दरम्यान, अकोले पंचायत समितीची २०१७ मध्ये निवडणूक झाली. पहिली अडीच वर्षे सभापती व उपसभापती हे शिवेसेनेचे होते. त्यानंतर २०२० मध्ये अडीच वर्षासाठी दुसर्यांदा निवडी झाल्या. त्यावेळी माजी आमदार वैभव पिचड हे भाजपात दाखल झालेले होते. त्यांनी शेवटच्या टप्प्यात शिवसेनेकडून पंचायत समिती आपल्या ताब्यात घेत सभापती व उपसभापती हे भाजपाचे बसविले. दरम्यान, आज येथे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे किरण लहामटे हे आमदार आहेत. त्यामुळे पंचायत समितीसाठी येथे लहामटे-पिचड आणि भांगरेंच्या गटात सामना पहायला मिळेल.

कोपरगाव पंचायत समितीमध्ये २०१७ पर्यंत कोल्हे गटाचे वर्चस्व होते. मात्र फेब्रुवारी २०१७ च्या निवडणुकीत पहिल्यांदाचा आशुतोष काळे यांनी कोल्हेंना सत्तेतून पायउतार केले. त्यामुळे प्रशासक येईपर्यंत दोन्ही अडीच अडीच वर्षे काळेंची अर्थात राष्ट्रवादीची सत्ता पहायला मिळाली. येणार्या निवडणुकीत आता पुन्हा काळे विरोधात कोल्हे यांचा संघर्ष पहायला मिळणार आहे.

संगमनेर पंचायत समितीवर आजतागायत माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचेच वर्चस्व दिसलेले आहे. शेवटच्या अडीच वर्षातील सभापती निवडीवेळी थोरात गटाच्या सभापती व उपसभापती पदाच्या उमेदवारांना १३-१३ तर विरोधी शिवसेनेच्या दोन्ही उमेदवारांना ५-५ मते मिळाली होती. या वेळी काँग्रेस जिंकली होती. आज चित्र बदलले आहे. येथे शिंदे गटाचे अमोल खताळ हे आमदार झाले आहेत.

श्रीरामपूर पंचायत समितीत २०१७ मध्ये आठ सदस्य आहेत. काँग्रेसचे चार सदस्य विजयी झाले होते. ओबीसी आरक्षण निघाले, काँग्रेसकडेच डॉ. वंदना मुरकुटे व संगीता शिंदे असे दोन ओबीसी सदस्य होते. सभापती निवडीवेळी संगीता शिंदे यांनी विरोधी सदस्यांची मदत घेवून सभापतीपद मिळवले. त्यामुळे संगीता शिंदे यांच्यावर अपात्रतेची कारवाईची मागणी झाली. त्यांच्यावर जिल्हाधिकार्यांनी अपात्रतेची कारवाई केली. त्यामुळे सात सदस्य राहिले. पुढेही अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. प्रकरण न्यायालयापर्यंत पोहचले. शेवटच्या टप्यात ही पंचायत समिती विखे गटाच्या ताब्यात आल्याची दिसली. आज आमदार पुन्हा काँग्रेसचे हेमंत ओगले झाले आहेत.त्यामुळे ससाणे गटाला ताकद मिळाली असून , येथे ससाणे, मुरकुटे गट विरोधात विखे-आदिक गट असा सामना पुन्हा पहायला मिळेल.

जामखेड पंचायत समितीच्या शेवटच्या टप्प्यातील सभापती निवडीवेळी मतमोजणी स्थगित करण्यात आली होती. राष्ट्रवादीच्या राजश्री मोरे व भाजपाच्या



मनिषा सुरवसे यांना समान मते मिळाली. त्यामुळे चिठ्ठी टाकण्यात आली. यात राष्ट्रवादी रोहित पवार गटाच्या मोरे ह्या नशीबवान ठरल्या होत्या. येथे आमदार रोहित पवार हे राष्ट्रवादीचे आमदार आहेत. भाजपाचे आ. प्रा. राम शिंदे यांच्याशी त्यांचे पुन्हा घमासान दिसणार आहे.

कर्जत पंचायत समितीत रोहित पवारांचे वर्चस्व दिसले होते. मनिषा जाधव यांची बिनविरोध वर्णी लागली होती.या निवडीवेळी भाजपचे दोन सदस्य गैरहजर होते.तर शिवसेनेचा एकमेव सदस्य हा देखील महाविकास आघाडीत आलेला होता. आताही येथे आ. रोहित पवार व राम शिंदे यांच्यात सत्तासंघर्ष पहायला मिळेल.

राहाता पंचायत समिती ही मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ताब्यात आहेत. येथे सर्वच्या सर्व १० सदस्य हे विखे गटाचे विजयी झालेले आहेत. नंदाताई तांबे आणि ओमेश जपे हे सभापती व उपसभापती होते. येथे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे कायमच वर्चस्व दिसले आहे.

श्रीगोंदा पंचायत समितीत माजी मंत्री आमदार बबनराव पाचपुते यांच्या भाजपाचे सात तर दोन्ही काँग्रेसचे पाच सदस्य निवडून आले होते. येथे पहिल्या टर्मचे भाजपाचे सभापती पुरुषोत्तम लगड यांनी राजीनामा दिला होता. त्यानंतर २०२० मध्ये दुसरी टर्मच्या निवडीवेळी राष्ट्रवादीचे माजी आमदार राहुल जगताप यांनी चक्रे फिरवली. यात भाजपाच्या एका महिला सदस्याने अचानक आघाडीला पाठींबा दिला. त्यामुळे पाचपुतेंकडून जगताप यांनी पंचायत समिती राष्ट्रवादी-काँग्रेसकडे खेचून आणली.आता विद्यमान आमदार हे विक्रमसिंह पाचपुते आहेत. भाजपाच धुरा त्यांच्यावरच आहे. त्यांच्याविरोधात येथे शिवसेना ठाकरे गटाला साजन पाचपुते, राजेंद्र नागवडे हे ताकद देणार आहेत. तर राहुल जगताप हे राष्ट्रवादी शरद पवार गटाला ऊर्जितावस्थेत आणण्याचा प्रयत्न करताना दिसू शकतात.नेवासा पंचायत समितीत २०१७ ते २०२२ पर्यंत माजी आमदार शंकरराव गडाख यांचेच वर्चस्व दिसले. त्यांचे १४ पैकी १२ सदस्य निवडून आले होते.दोन्ही टर्मची अडीच अडीच वर्षे सभापती व उपसभापती निवडी ह्या बिनविरोध करण्यात आल्याचे दिसले होते.

मात्र आता नेवाशाचे आमदार हे शिंदे सेनेचे विठ्ठलराव लंघे आहेत. त्यांना भाजपाची मोठी ताकद मिळालेली आहे.त्यामुळे गडाखांच्या ताब्यातून पंचायत समिती काढून घेण्यासाठी आ. लंघे हे प्रयत्न करणार हे नक्की.शेवगाव पंचायत समितीत २०१७ च्या निवडणुकीत सर्व आठ जागांवर माजी आमदार चंद्रशेखर घुले यांचे सदस्य विजयी झाले होते. त्यामुळे पहिल्या व दुसर्या टर्ममध्येही क्षितीज घुले हेच सभापती होते. शेवटच्या अडीच वर्षात सभापती पद हे खुल्या गटाला मिळाल्याने त्यांचीच फेरनिवड करण्यात आली होती. आताही येथे घुले यांच्याविरोधात आमदार राजळेंचा गट एकमेकांसमोर उभा राहणार आहे. येथील लढतीही लक्ष वेधून घेणार्या ठरू शकतात.

राहुरी तालुक्यात पंचायत समितीचे १० गण आहेत. यात सहा गणात माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचे सदस्य निवडून आले होते. तर विरोधी विखे-कर्डिले गटाचे चार सदस्य होते. येथे दोन्हीही टर्म तनपुरे गटाचाच वरचष्मा पाहायला मिळाला. मात्र आता आमदार म्हणून शिवाजी कर्डिले विजयी झाले.तनपुरेंचा पराभव झाला. त्यामुळे तनपुरेंकडील पंचायत समिती ताब्यात घेण्यासाठी विखे-कर्डिले गटातून ताकद लावली जाणार आहे

नगर पंचायत समितीत शिवसेना-काँग्रेसची तालुका विकास आघाडीचे ८, तर भाजपाचे ४ सदस्य होते. शिवसेनेच्या सुरेखा गुंड यांची सभापती व डॉ.दिलीप पवार यांची उपसभापती पदी बिनविरोध निवड झाली होती. आता आ. कर्डिले पुन्हा आमदार झाले आहेत. तर पारनेरमधून काशीनाथ दाते हे महायुतीचेच आमदार आहेत. तिकडे श्रीगोंद्यातून भाजपाचे पाचपुते आमदार आहेत.त्यामुळे नगर तालुक्यात भाजपाचे वर्चस्व पहायला मिळते.त्यामुळे पंचायत समिती गणातही हेच चित्र राहणार का, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

पाथर्डी पंचायत समितीत १० गण आहेत. आमदार मोनीका राजळे यांचे स्पष्ट बहुमत होते. त्यामुळे दोन्ही टर्मला या ठिकाणी भाजपाचे सभापती व उपसभापती पहायला मिळाले. येथे प्रताप ढाकणे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गट जिवंत ठेवला आहे. पंचायत समितीच्या गत निवडणुकीत अवघ्या एक-दोन जागांवर ढाकणेंना समाधान मानावे लागले होते. त्यात आताही राजळे ह्याच आमदार झाल्या आहेत. त्यामुळे पंचायत समितीसाठी ढाकणेंना मोठे प्रयत्न करावे लागणार आहेत. पारनेरमध्ये २०१७ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी व शिवसेनेला प्रत्येक चार-चार, तर काँग्रेसला दोन जागा मिळाल्या होत्या. शेवटच्या टप्यात ही पंचायत समिती नीलेश लंकेंकडे होती. मात्र आता राणी लंके यांचा पराभव झाला. काशीनाथ दाते हे अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार झाले. त्यामुळे गट-गणातही येथे शरद पवारांची राष्ट्रवादी विरोधात महायुती असे सामने रंगलेले दिसणार आहेत.

चिचोंडी पाटील,देऊळगाव सिद्धी,भातोडी, मांडवे शाळांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

अहिल्यानगर । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या नगर तालुका विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा वाळकी येथे मोठ्या उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धांमध्ये चिचोंडी पाटील, देऊळगाव सिद्धी, भातोडी, मांडवे या शाळांनी बाजी मारत जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी आपला प्रवेश निश्चित केला आहे.

पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाबुराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत व वाळकी बिटच्या विस्तार अधिकारी श्रीमती मंदा जगताप –माने यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली व वाळकी हायस्कुलचे प्राचार्य काकासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नगर तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा व कार्यक्रमांत उत्कृष्ट प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जालिंदर खाकाळ व आभार प्रदर्शन श्रीमती मोनाली चौधरी यांनी केले. परीक्षक म्हणून विविध माध्यमिक शिक्षकांनी गुणदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी न्यू इंग्लिश स्कूलचे तुकाराम उकिरडे व इतर माध्यमिक शिक्षक, वाळकी बिटमधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांनी परीश्रम घेतले.प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे हस्ताक्षर स्पर्धा– किलबिल गट –पंचमुख अनुष्का राहुल (बाबुर्डी घुमट), बालगट –हजारे प्रांजल सुभाष (चिचोंडी पाटील), किशोरगट – लांडगे शुभा संदिप (घोसपुरी), कुमारगट – सांगळे प्रांजली पोपट (बाबुर्डी घुमट), वक्तृत्व स्पर्धा – किलबिल गट – कोतकर आरोही बाळासाहेब (राळेगण), बालगट – खांदवे अनन्या संदिप (चिंचोंडी पाटील), किशोरगट – गवळी स्वराली सचिन (निंबोडी), कुमारगट – म्हस्के धनश्री संपत (दहिगाव), गोष्ट सादरीकरण – बालगट गट – लांडगे श्रावणी रामकिसन (पिंपळगाव लांडगा), किशोर गट – बोठे अनुष्का गोविंद (देऊळगाव सिद्धी), कुमार गट – ससे वैष्णवी ज्ञानदेव (ससेवाडी), वेशभुषेनुसार सादरीकरण – किलबिल गट – शेवलेकर मयुरी किशोर (शिवाजीनगर केडगाव), बालगट – कदम मानसी मुकुंद (भातोडी), किशोर गट – इंगळे सायली सचिन (देऊळगाव सिद्धी), कुमारगट – खांदवे तनुजा सचिन (सांडवे), वैयक्तिक गीतगायन – किलबिल गट पुंड अथर्व गहिनीनाथ (अरणगाव), बालगट – हजारे जान्हवी किशोर (अकोळनेर), किशोरगट – बारवेकर आयुष अतुल (रांजणी), कुमारगट – काळे अक्षरा अशोक (ससेवाडी), समुहगीत गायन – लहान गट – जि. प. प्रा. केंद्रशाळा चिचोंडी पाटील, मोठा गट – जि. प. प्रा. शाळा देऊळगाव सिद्धी, सांस्कृतिक कार्यक्रम – लहान गट – जि. प. प्रा. शाळा भातोडी, मोठा गट – जि. प. प्रा. शाळा मांडवे



नगरोत्थान योजनेतील २४ पैकी १३ रस्त्यांची कामे ४५ टक्के पूर्ण; उर्वरित कामेही लवकरच सुरू होणार

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शहरातील प्रमुख २३ रस्ते व १ नाल्याच्या कामासाठी शासनाने १५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. यातील १३ रस्त्यांची कामे प्रगती पथावर असून ही कामे ४५% पूर्ण झाली आहेत.

उर्वरित कामही लवकरच सुरू होत आहेत. महानगरपालिकेमार्फत शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालातील इतर कामांसाठीही लवकरच निधी उपलब्ध होणार आहे. सध्याच्या कामांसाठी जानेवारी २०२६ अखेर मुदत आहे. मात्र ही कामे मुदतीपूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त डांगे यांनी दिली.

आयुक्त डांगे यांनी शहरात सुरू असलेल्या प्रमुख रस्त्यांच्या कामांचा आढावा घेतला. शासनाने २४ कामे मंजूर केलेली आहेत. त्यात २३ रस्त्यांची कामे व १ नाल्याचे काम आहे. सध्या १३ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. ही कामे भौतिक दृष्ट्या ४५% पूर्ण झालेली आहेत. तर आर्थिक दृष्ट्या ३०% पूर्ण झाली आहे. या २३ रस्त्यांच्या माध्यमातून सुमारे १७ किलोमीटर लांबीचे रस्ते होणार आहेत. तर दोन किलोमीटर लांबीच्या नाल्याचे सुशोभीकरण होणार आहे.



सदर कामे विकास योजनेतील रस्त्यावर असल्याने विकास योजनेच्या रुंदीप्रमाणे होत आहेत. त्यात अडथळा ठरणारी अतिक्रमण काढणे, इलेक्ट्रिक लाईन, पाण्याची लाईन स्थलांतरीत करून दोन्ही बाजूने गटार करून काँक्रिटीकरण प्रस्तावित आहे. या कामांकरिता जुलै २०२४ महिन्यात कार्यादेश देण्यात आलेला आहे. कामाची मुदत जानेवारी २०२६ पर्यंत आहे. मात्र, मुदतपूर्व कामे पूर्ण करण्याचा संकल्प महानगर पालिकेने केला आहे. त्या दृष्टीने मनपाचे प्रयत्न असून मनपा आर्थिक दृष्ट्या व प्रशासकीय दृष्ट्या सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सक्षम असल्याचेही त्यांनी सांगितले.सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होणार आहे. शहराच्या सौंदर्यात देखील भर पडणार आहे. त्याचबरोबर वारंवार रस्त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची वेळ मनपावर येणार नाही. नागरिकांना चांगली सेवा उपलब्ध होईल. आत्तापर्यंत शासकीय अनुदानातील २१ कोटी रुपये व मनपा हिस्स्यातील ४.५० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. उर्वरित हिस्स्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. लवकरच शासनाकडून पैसे भरण्यासाठी तरतूद करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले

जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार शिवाजीराव कर्डिले यांना २०२४ बेस्ट चेअरमन ऑफ दि इयर पुरस्कार प्रदान

अहिल्यानगर । प्रतिनिधी

राज्य सहकारी बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्या साठी इनजेनियस लीडरशिप समिट देशपांतळीवरील आयकॉनिकलीडर अवॉर्ड २०२४ या वर्षी गोव्यातील विंडफ्लॉवर रिसॉर्ट आणि स्पा वर्का या पंचतारांकित रिसॉर्ट येथे संपन्न झाला.

२०२४ चा देशपांतली वरील जिल्हा सहकारी बँकेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल उत्कृष्ट चेअरमन म्हणून अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन आमदार श्री शिवाजीराव कर्डिले यांना २०२४ बेस्ट चेअरमन ऑफ दि इयर चा पुरस्कार अखिल भारतीय राट्रीय सहकारी संघ,नवी दिल्लीचे चेअरमन मा.खा.श्री. दिलीप संघवी यांच्या शुभहस्ते देण्यात आला.

या प्रसंगी गोवा विधानसभा अध्यक्ष नामदार श्री अनंत शेट, गोवा राज्याचे नामदार श्री.सुभाष फल देसाई, मंत्री समाज कल्याण, नदी व जलवाहतूक आणि पुरातत्व शास्त्र तसेच भारतातील राज्य सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँकांचे अध्यक्ष, सीईओ,अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरस्कार स्विकारल्यानंतर जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन आमदार शिवाजीराव कर्डिले म्हणाले,जिल्हा बँकेवर विश्वास ठेऊन रुपये



दहा हजार कोटीच्या वर ठेवीददरांनी ठेवी ठेवल्या असून जवळपास साडेसात हजार कोटीचे कर्ज येणी बाकी असून मी जिल्हा बँक व सामाजिक कार्याच्या माध्यमातून शेतकरी व समाजातील शेवटचा घटकांची सेवा करण्याचे कार्य केल्याने मला हा पुरस्कार मिळाला. राजकीय जीवनात हा पहिलाच पुरस्कार असल्याचेही माहिती श्री. शिवाजीराव कर्डिले यांनी दिली.

श्री.शिवाजीराव कर्डिले यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार, महसूल मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटिल, मा.खासदार सुजय विखे पाटील,विविध जिल्हा बँकांचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे.

निर्दयी मातेने पोटच्या गोळ्याला उकिरड्यावर फेकले

माणिकवाडा । प्रतिनिधी

जन्मदात्री जननीच आपल्या पोटच्या गोळ्याला फेकून देऊ शकते, हे ऐकूनही अंगावर शहारे येतात. माणिकवाडा गावात घडलेल्या धक्कादायक घटनेने गावकऱ्यांमध्ये खळबळ उडवली आहे. शुक्रवारी सकाळी मध्य वस्तीत एका उकिरड्यावर लहान मुलीच्या रडण्याचा आवाज ऐकून शेजाऱ्यांनी घटनास्थळ गाठले. बाळ एका पिशवीत भरून उकिरड्यावर फेकल्याचे दिसून आले.

गावकऱ्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी बाळाला ताब्यात घेऊन उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. अवघ्या एका तासात पोलिसांनी तपास करून त्या बाळाच्या कुमारी मातेला शोधून काढले. संबंधित महिलेला आणि बाळाला पुढील उपचारासाठी वर्ध्याला पाठवण्यात आले आहे.

पहाटेच्या सुमारास कुमारी मातेने बाळाला



जन्म दिला. बदनामी होईल या भीतीने तिने बाळाला एका पिशवीत भरून उकिरड्यावर फेकले. सकाळी उजेड पडल्यावर हे कृत्य उघडकीस आले. स्थानिक नागरिकांनी पोलिसांना याची माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुरावे गोळा केले. महिला पोलिस कर्मचारी शारदा दाभाडे यांच्या मदतीने बाळाला सुरक्षेत घेण्यात आले. या नवजात अर्भकाचे डोक्याला किरकोळ जखम झाली असून सध्या बाळ सुरक्षित आहे.

अविवाहित मातेने बाळाला जन्म दिल्याची जिल्ह्यातील ही दुसरी घटना आहे. याआधी जिल्हा रुग्णालयात एका कुमारी महिलेला बाळ होताच त्याला अवैधरीत्या दत्तक देण्याचा प्रयत्न झाला होता. अशा घटनांमध्ये वाढ होत असल्याने या प्रकारांना आळा घालण्यासाठी सामाजिक आणि प्रशासकीय पातळीवर उपाययोजना करण्याची गरज आहे.

आष्टी पोलिस ठाण्याचे ठाणेदार बबन पुसाटे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही घटना उघडकीस आणली. पुढील तपास सुरू असून या घटनेने समाजासमोर गंभीर प्रश्न निर्माण केला आहे. अविवाहित मातांवरील ताण, सामाजिक दबाव आणि यामागील कारणांचा शोध घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

अशा घटनांना थांबवण्यासाठी जनजागृती आणि समुपदेशनाची गरज आहे. गावकऱ्यांनी केलेल्या तत्परतेने एक निष्पाप जीव वाचला, परंतु अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी समाजाने पुढाकार घेणे महत्त्वाचे आहे

खराब रस्त्याने घेतला आश्रम शाळेच्या कर्मचाऱ्याचा बळी

भद्रावती । प्रतिनिधी

खराब रस्त्याने जाताना तोल जाऊन व दुचाकीवरुन पडून आदिवासी आश्रम शाळेच्या कर्मचाऱ्याला आपला जीव गमवावा लागल्याची घटना भद्रावती शहरातील देवालय सोसायटीच्या रस्त्यावर दि.१४ डिसेंबर रोजी रात्री घडली.

प्राप्त माहितीनुसार, येथील विंजासन रस्त्यापासून देवालय सोसायटीकडे जाणारा रस्ता अतिशय खराब आहे. या रस्त्यावरील गिट्टी उखडलेली आहे. त्यामुळे या रस्त्याने जाताना नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.दि.१४ डिसेंबर रोजी रात्री दिलिप सिडाम (५२) हे या रस्त्याने जात असताना त्यांची दुचाकी घसरल्याने अपघात झाला. त्यांची गाडी स्लिप होऊन ते रस्त्याच्या कडेला साचलेल्या पाण्यात पडले. सुमारे एक तास कोणाचेही लक्ष न गेल्याने त्यांना मदत मिळाली नाही. लोकांच्या निदर्शनास आल्यावर त्यांना तात्काळ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.दिलीप सिडाम हे जिवती



येथील शासकीय आश्रम शाळेत कार्यरत होते. त्यांच्या मांगली (रै.) या मूळ गावी त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले.

सिडाम ४ वर्षांपासून देवालय सोसायटी भद्रावती येथे राहत होते. तेथे त्यांचे सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध होते. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे कुटुंब, नातेवाईक, सहकारी आणि देवालय वासीयांमध्ये शोककळा पसरली आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 'गुरूशाळा' उपक्रम सुरू, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न

वर्धा । प्रतिनिधी

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने नवी दिल्लीतल्या प्रथम एज्युकेशन फाउंडेशनसोबत सामंजस्य करार करून 'गुरूशाळा' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामुळे आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाची आवड निर्माण होऊन त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत मोठी वाढ होईल, असा विश्वास आदिवासी विकास आयुक्त नयना गुंडे यांनी व्यक्त केला आहे.



राज्यातील ४९७ शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे दोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या अध्ययन पातळीचे मूल्यमापन करून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी 'गुरूशाळा' उपक्रम हाती घेण्यात आला आहे. प्रथम एज्युकेशन फाउंडेशनसोबत २०२४-२५ ते २०२६-२७ या तीन वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

तीन टप्प्यांतील उपक्रमाची अंमलबजावणी

पहिला टप्पा: विद्यार्थ्यांचे अध्ययन मूल्यमापन.

दुसरा टप्पा: शिक्षकांसाठी अध्यापन कौशल्यवृद्धीचे प्रशिक्षण.

तिसरा टप्पा: अधीक्षक आणि अधिक्षिकांसाठी नेतृत्व क्षमता विकास प्रशिक्षण.

या प्रशिक्षणामुळे शिक्षकांना अध्यापन पद्धतीत नवनवीन सुधारणा करता येतील, तर विद्यार्थ्यांना अध्ययन सुलभ आणि प्रभावी होईल. 'आदर्श शाळा स्पर्धा'चा उपक्रम यशस्वी गुरूशाळा उपक्रमांतर्गत 'आदर्श शाळा स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ४९७ प्रकल्प सादर झाले, त्यापैकी २८७ प्रकल्प पुढील टप्प्यासाठी निवडले गेले. यामध्ये नाशिक, ठाणे, नागपूर आणि अमरावती आयुक्तालयांतील प्रकल्पांचा समावेश आहे. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळावी, अध्यापन आणि अध्ययन प्रक्रियेत सुधारणा व्हावी, यासाठी 'गुरूशाळा' उपक्रम प्रभावी ठरेल. परिणामी, शासकीय आश्रमशाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावेल, अशी अपेक्षा नयना गुंडे यांनी व्यक्त केली.

यशश्री प्री स्कूलच्या चार शिक्षीका 'द फाउंडेशन बिल्डर वॉर्ड' ने सन्मानित

अहिल्यानगर । प्रतिनिधी

समाजाचा सर्वांगीण विकास साधून राष्ट्र निर्माणात योगदान देणारी पिढी घडविण्याचे काम शिक्षक, शिक्षण संस्था चालक करत असतात. पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षकांचा चित्रकूट गुरुकुलच्या वतीने 'द फाउंडेशन बिल्डर वॉर्ड' ने सन्मान करण्यात आला.

जेऊर येथील यशश्री प्री स्कूलच्या चार शिक्षीकांचा 'द फाउंडेशन बिल्डर वॉर्ड' ने सन्मान करण्यात आल्याने परिसरातील नागरिकांकडून यशश्री स्कूल व सन्मानित शिक्षीकांचे कौतुक करण्यात येत आहे. चित्रकूट गुरुकुलच्या प्राचार्या सारिका आनंद चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलचे संचालक संजय चव्हाण, अशोक सचदेव यांच्या मार्गदर्शनाखाली सन्मान सोहळा नूकताच संपन्न झाला. नगर परिसरातील विविध शाळांचे प्राचार्य, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जेऊर येथील यशश्री प्री स्कूलच्या प्राचार्या सौ. मनीषा पवार व मार्गदर्शक राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या



शिक्षिका वेदिका मगर, नलिनी खंडागळे, पुजा पवार, अंजली धनवळे या शिक्षीकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. चिमुकल्या विद्यार्थ्यांना हसत खेळत शिक्षण व सर्व गुण संपन्न घडविण्यासाठी यशश्री स्कूलच्या वतीने नवनवीन उपक्रम राबविण्यात येत असतात. त्यामध्ये प्राचार्या मनीषा पवार व शिक्षीकांचा मोठा सहभाग असतो. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.यशश्री प्री स्कूल जेऊरने शिक्षण क्षेत्रात आपला आगळा वेगळा ठसा निर्माण केला आहे. विद्यार्थ्यांना सर्व गुणसंपन्न घडविण्यासाठी विविध नवनवीन उपक्रम राबविले जातात. संस्कृतीचे जतन व एकोपा शाळेत पहावयास मिळतो. यशश्री स्कूलने आपल्या कार्यकर्तृत्वातून नावलौकिक मिळवला आहे. त्यांच्या शिक्षीकांचा झालेला सन्मान हा त्याचेच फळ आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरावर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

आठवेळा आमदार;सातवेळा मंत्री पदाची शपथ घेण्याचा ना.विखेंना सन्मान!





अहिल्यानगर । प्रतिनिधी

राज्याच्या विधानसभेत सलग आठ वेळा शिर्डी विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व आणि सात वेळा विविध विभागांच्या मंत्रीपदाची यशस्वी धुरा सांभाळणारे ना.राधाकृष्ण विखे पाटील यांचा महायुतीच्या मंत्रीमंडळात दुस-यांदा झालेला समावेश अहिल्यानगरच्या राजकीय क्षेत्रात वर्चस्व सिध्द करणारा ठरला आहे.महायुतीला दहा जागांवर मिळवून दिलेले घवघवीत यश,सहकार क्षेत्रातील दिग्गज नेतृत्व आणि भाजपा नेत्याचा सार्थ ठरवलेला विश्वास यासाठी कारणीभूत ठरला आहे.

सहकार चळवळीची असलेली पार्श्वभूमी आणि लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या राजकीय सामाजिक चळवळीतील एक कार्यकर्ता म्हणून वाटचाल करणारे ना.विखे पाटील यांनी सहकार क्षेत्रातील विविध संस्थांची पद भूषवून या क्षेत्रात नाविन्याची निर्मिती केली. सहकारा बरोबरच शिक्षण क्षेत्रातही त्यांनी आपल्या दुरदृष्टीकोनातून संस्थाचा पाया अधिक भक्कम केला. पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्यास पुर्ण झालेली ७५ वर्ष, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेची ५० वर्षांची यशस्वी वाटचाल आणि सहकारी बॅकींग क्षेत्रात नावलौकीक प्राप्त केलेल्या प्रवरा सहकारी बॅकेस पुर्ण झालेले ५० वर्ष यासर्वांमार्ग ना.राधाकृष्ण विखे पाटील यांचे अभ्यासू नेतृत्व उपयुक्त ठरले आहे.

१९९५ पासून शिर्डी विधानसभा मतदार संघाचे त्यांनी प्रतिनिधीत्व केले. राहाता तालुक्याच्या निर्मिती पासून ते अलिकडच्या काळात स्थापन झालेले अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, काकडीचे विमानतळ, न्यायालयाची स्वतंत्र इमारत अशा अनेक ठळक बाबी या त्यांच्या विकासाच्या वाटचालीतील मानबिंदु ठरले आहेत. विकास कामांच्या सक्रीयतेमुळेच शिर्डी मतदार संघातून सलग आठव्यांदा चांगल्या मताधिक्याने निवडून जाण्याचा विक्रमही त्यांनी नोंदविला आहे.

कोणत्याही मंत्रीपदाची जबाबदारी आली की, त्या विभागाचा चेहरा मोहरा बदलण्याची क्षमता ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात आहे. सरकार आणि संघटना यांचा योग्य समन्वय साधून काम करण्याचा मोठा अनुभव ना.विखे पाटील यांच्या पाठीशी असल्यामुळे जिल्ह्याच्या विकास प्रक्रीयेला यामुळे गती मिळाल्याचे पाहायला मिळाले. यापुर्वी भाजप सेनेचे सरकार असताना १९९७ ते ९९ या कार्यकाळात कृषि, जलसंधारण, दूग्ध व्यवसाय या विभागांची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. ऍग्रो ऍडव्हन्टेज हे कृषि क्षेत्रातील अंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरवून त्यांनी आपल्या कार्याची वेगळी ओळख दाखवून दिली होती.

शालेय शिक्षण, विधी व न्याय, परिवहन, बंदरे विकास, गृहनिर्माण मंत्री म्हणून त्यांनी लोकहिताचे निर्णय घेण्यास प्राधान्य दिले. अनुदानित शाळांसमोरील कायम शब्द काढण्याचा महत्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतल्यामुळेच अनुदानित शाळांचा मोठा प्रश्न सोडविण्यात यश आले. स्कुलबसचे धोरणही त्यांच्याच कार्यकाळात राज्यात लागु करण्यात आले होते.

२०१९ नंतर ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी भाजपात जाण्याचा निर्णय घेतला. दक्षिण लोकसभा मतदार संघातून लोकसभेची उमेदवारी डॉ.सुजय विखे पाटील यांना मिळवून मोठा विजय मिळविला. त्यानंतर जिल्हा पुर्णपणे भाजपमय करण्यासाठी त्यांचे विशेष प्रयत्न राहीले. मागील अडीच वर्षात राज्यात स्थापन झालेल्या महायुती सरकारमध्ये महसूल मंत्री पदाची मोठी जबाबदारी पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर सोपविली. या माध्यमातून राज्याच्या हिताची निर्णय त्यांनी घेतले.

अहिल्यानगरचे पालकमंत्री म्हणून शासन आपल्या दारी या उपक्रमातून त्यांनी महायुती सरकारच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. प्रशासनाच्या सहकार्याने योजनांच्या अंमलबजावणीत अहिल्यानगर जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्यात ना.विखे पाटील यांचे प्रयत्न महत्वाचे ठरले. जिल्ह्याच्या दृष्टीने तीन औद्योगिक वसाहतींना उपलब्ध करुन दिलेले जागा, निळवंडे धरण कालव्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी केलेला पाठपुरावा, गोदावरी कालव्यांच्या नुतणीकरणासाठी २०० कोटी रुपयांचा उपलब्ध केलेला निधी, सावळीविहीर येथे मंजुर झालेले शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय, काकडी विमानतळाच्या टर्मिनल इमारतीसाठी मंजुर झालेला ६०० कोटी रुपयांचा निधी निधी उपलब्ध करुन मतदार संघाच्या विकासाला मोठी गती दिली आहे. जिल्ह्यातील युवकांना जिल्ह्यातच रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शिर्डीतील औद्योगिक वसाहतीमध्ये येणारे उद्योग ही मोठी उपलब्धी त्यांच्या कार्यकाळात ठरली आहे.

भविष्यात अहिल्यानगर शहरामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे राष्ट्रीय स्मारक उभारणे आणि श्रीक्षेत्र नेवासे येथील ज्ञानेश्वर सृष्टीची उभारणी हा त्यांचा संकल्प असून, जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र पर्यटनाला नवी दिशा देण्याचाही त्यांचा प्रयत्न असणार आहे.

नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघात त्यांनी योग्य समन्वय घडवून उमेदवार निवडून आणण्यात यश मिळवले.लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाची जाणीव ठेवून संघटनात्मक पातळीवर त्यांनी योग्य लक्ष केंद्रीत करून मित्र पक्षांमध्येही चांगला संवाद ठेवाल्याचा परीणाम या यशामागे दिसून येतो.

महायुती मधील जबाबदारी त्यांनी आपल्या मंत्री पदाच्या कार्यकाळात कुठेही वादग्रस्त न ठरता महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या विरोधात तेवढीच प्रखर भूमिका मांडली.

सहकार क्षेत्रातील अनुभवी नेतृत्व म्हणून त्यांनी भाजपा मध्ये निर्माण केलेले स्थान उल्लेखनीय ठरत आहेच.परंतू विधानसभा निवडणुकीत कॉग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांचा पराभव करण्यात बजावलेल्या महत्वपूर्ण भूमिकेभूमिकेमुळे भाजपाच्या केंद्रीय व राज्यातील नेत्यांचा सार्थ ठरवलेला विश्वास यासाठी कारणीभूत ठरला आहे.

भैरवनाथ देवस्थानच्या अन्नछत्रासाठी फिरोदिया कुटुंबियांकडून मोठी मदत

अहिल्यानगर । प्रतिनिधी



:जिल्ह्यातील आगडगाव येथील काळ भैरवनाथ देवस्थानतर्फे सुरू असलेल्या अन्नछत्रालयासाठी उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी गेले वर्षभर सुमारे दहा लाखांचे तेल दिले. तसेच पुढील वर्षीही लागणारे तेल देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या अन्नछत्रालयासाठी मोठी मदत झाली आहे, अशी माहिती देवस्थान ट्रस्टच्या वतीने देण्यात आली.


भैरवनाथ देवस्थानमध्ये प्रत्येक रविवारी बाजरीची भाकरी -आमटी असा महाप्रसाद सुरू असतो. सोबत गोड पदार्थ, ठेचा, भात असे पदार्थ असतात. प्रत्येक भाविकाला मोफत पोटभर जेवण, असे त्याचे स्वरुप असते. यासाठी अन्नदात्यांकडून देणगी स्वीकारली जाते. या भूमित अन्नदानाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे भाविकांकडून पुढील सुमारे सहा महिन्यांची नावनोंदणी झाली आहे. वाढदिवसासारखे निमित्त असेल, तर त्याला लवकर अन्नदानाची सेवा देण्यासाठी ट्रस्टकडून नियोजन केले जाते. प्रत्येक रविवारी सुमारे दहा हजार भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात.

अन्नदानाच्या उपक्रमासाठी मोठा खर्च येतो. अन्नदात्यांकडून अत्यंत माफक मदत घेतली जाते. उर्वरीत मोठ्या खर्चामध्ये तांदूळ, तेल याचा समावेश असतो. तेलासाठी नरेंद्र फिरोदिया यांनी गेल्या वर्षभर देणगी दिली. पुढील वर्षासाठी लागणारे तेलही आपण देणार असल्याचे त्यांनी नुकतेच जाहीर केले. दरम्यान, फिरोदिया यांनी यापूर्वी बस, रुग्णवाहिका तसेच विविध विकासकामांसाठी मोठी मदत दिली आहे. करोना काळात त्यांनी दिलेल्या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून परिसरातील ग्रामस्थांना मोफत सेवा देण्यात आली, असे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले.

आठवडे बाजारात होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी मोहीम

राहाता । प्रतिनिधी

आठवडे बाजारात होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी व नागरिकांमध्ये जागरूकता आणण्यासाठी राहाता पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांनी गुरुवारी आठवडे बाजारात पोलीस कर्मचाऱ्यांना बरोबर घेऊन मोहीम राबवली.आठवडे बाजारात नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तूची काळजी घ्यावी, बाजारात येताना मौल्यवान वस्तू आणू नये, याकरिता प्रथमच राहाता पोलीस निरीक्षक गलांडे यांनी गुरुवारी आठवडे बाजारात पोलीस कर्मचाऱ्यांना बरोबर घेऊन नागरिकांना जागरूक करण्याचे काम केले. राहाता शहरात प्रत्येक गुरुवारी वीरभद्र मंदिरासमोर व पाठीमागील बाजूस तसेच साकुरी हद्दीत आठवडे बाजार भरतो. या आठवडे बाजारासाठी परिसराच्या गावातील नागरिक मोठ्या संख्येने विविध प्रकारचे साहित्य भाजीपाला, कपडे, खाद्यपदार्थ खरेदी करण्यासाठी येतात. या परिसरात मोठ्या प्रमाणात वीटभट्टी , फळांच्या बागा



तसेच शिर्डी व राहाता परिसरात बांधकाम व्यावसायिक, हॉटेल, लॉजिंग मोठ्या प्रमाणात असल्याने या ठिकाणी रोजगार मिळण्यासाठी मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. परिणामी आठवड्यात बाजारात विविध राज्यातून पोटाची खळगी भरण्यासाठी आलेले मजूर तसेच परिसरातील गावातील महिला व पुरुष गुरुवारी आठवडे बाजारात खरेदीसाठी येतात.याच गर्दीचा फायदा घेत इतर तालुक्यातील चोरटे प्रामुख्याने लहान वयातील मुले व महिला बाजारात येणाऱ्या नागरिकांचे मोबाईल व पाकीट तसेच महिलांच्या पर्स व मौल्यवान वस्तू चोरी करतात. प्रत्येक गुरुवारी तीन ते चार मोबाईल व पर्स तसेच पाकीट चोरी गेल्याची तक्रार राहाता पोलीस ठाण्यात दाखल होताम.राहाता पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांनी पुणतांबा, राहाता व इतर ठिकाणच्या आठवडे बाजारात होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करत स्वतः सहकाऱ्यांना बरोबर घेऊन त्यांनी आठवडच्यात बाजारात गस्त घालण्याचे काम सुरू केले आहे. बाजारात प्रथमच पोलीस निरीक्षक यांनी ही मोहीम राबवल्याने नागरिकांबरोबरच व्यावसायिकांनी त्यांच्या अनोख्या काम करण्याच्या पद्धतीवर कौतुक केले आहे

आरटीई प्रवेश प्रक्रियेला अखेर मुहूर्त

अहिल्यानगर । प्रतिनिधी



पहिली ते आठवीसाठी इंग्रजी शाळांमध्ये मोफत शिक्षणाची कवाडे उघडणार्या आरटीई प्रवेश प्रक्रियेला अखेर मुहूर्त मिळाला आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी १८ डिसेंबरला शाळा नोंदणीची प्रक्रिया सुरू होणार असून, जानेवारी महिन्यात विद्यार्थी नोंदणीला सुरुवात होईल.

तर, मार्च महिन्यात प्रवेशासाठीची लॉटरी जाहीर होईल. यंदा पहिल्यांदाच जून-जुलै महिन्यात संबंधित प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण विभागातील अधिकार्यांनी दिली आहे.

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत विशेषकरून इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये २५ टक्के आरक्षित जागांसाठी आरक्षित प्रवर्ग तसेच आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवली जाते. संबंधित प्रवेश प्रक्रिया दरवर्षी उशिरा सुरू होते. त्यातच ऑनलाइन यंत्रणेतील दोष, शासनाकडून मान्यता देण्यास होणारी दिरंगाई अशा विविध कारणांमुळे आरटीई प्रवेश प्रक्रिया रखडते. त्यामुळे एकीकडे डिसेंबर महिन्यात सीबीएसई शाळांमध्ये प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होत असली, तरी आरटीई प्रवेश प्रक्रियेला मात्र मुहूर्त लागत नव्हता. अखेर यंदा संबंधित प्रवेश प्रक्रिया डिसेंबर महिन्यात सुरू करण्यात येणार आहे.शासन स्तरावर कार्यवाही सुरु असल्याचे समजते.

आता शिर्डीत सशुल्क दर्शन पास वितरणसाठी कियॉस्क मशिनची सुविधा

अहिल्यानगर । प्रतिनिधी

नविन दर्शन रांग संकुलातील सशुल्क दर्शनपास काऊंटर येथे साईभक्तांकरीता जनसंपर्क विभागाअंतर्गत सुरु करणेत आलेल्या सशुल्क दर्शन पास वितरण प्रणाली कियॉस्क मशिन सुविधेचे कार्ड,



युपीआय उद्घाटन श्री साईबाबा संस्थानचे प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांचे हस्ते करण्यात आले.

सदर कियॉस्क मशिनव्दारे साईभक्तांना स्वतः सशुल्क दर्शन पास काढता येणार आहे.

यावेळी श्री साईबाबा संस्थानचे प्र.उप मुख्य कार्यकारी अधिकारी संदीपकुमार भोसले, प्रशासकिय अधिकारी प्रज्ञा महांडुळे - सिनारे, विश्वनाथ बजाज, उपकार्यकारी अभियंता भिकन दाभाडे, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, प्र. विभाग प्रमुख अनिल शिंदे, प्रविण मिरजकर, आय. टी. विभागाचे संजय गिरमे व टी सी एस कंपनीचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

तारामती चांदणे यांचे निधन

सोलापूर । प्रतिनिधी



देवळाली, तालुका करमाळा येथील रहिवासी तारामती लक्ष्मण चांदणे (वय ७०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

तारामती चांदणे या कमलादेवी कन्या विद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक व अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे तालुका संघटक भीष्माचार्य चांदणे यांच्या आई होत. त्यांच्यावर देवळाली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारावेळी सर्व स्तरातील नागरिकांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली.

विरोधकांचा चहापाण्याच्या कार्यक्रमावर बहिष्का

नागपुर-नागपुरात हिवाळी अधिवशन सुरू होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला रविवारी सायंकाळी सत्ताधाऱ्यांकडून चहापाण्याचा कार्यक्रम ठेवला आहे. परंतु या चहापाण्यावर विरोधकांकडून बहिष्कार टाकण्यात आला आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांची आज नागपुरात एक बैठक पार पडली. या बैठकीत सत्ताधाऱ्यांच्या चहापाण्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला.राज्यात कायदा व सुव्यवस्था पूर्णत: उद्ध्वस्त झालेली आहे. एका सरपंचाचा उचलून नेऊन खून केला जातो. त्या प्रकरणात राजकीय आरोपी आहेत. सरपंचांचा खून करण्याऱ्यांना पाठबळ असणाऱ्या नेत्याला मंत्रिपदाची शपथ दिली जाणार असल्याची चर्चा आहे. राजकीय गुंडांना आश्रय देणारे सरकार असेल, तर चहापाण्याला जाण्यात काय अर्थ आहे, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

वडिलांचे अतिक्रमण मुलास भोवले

अहिल्यानगर । प्रतिनिधी



राहुरी तालुक्यातील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या घोरपडवाडी ग्रामपंचायतचे लोकनियुक्त सरपंच मैनाबापू रावसाहेब शेंडगे यांना शासकीय मिळकतीमध्ये अतिक्रमण केल्यामुळे अपात्र करण्याचा आदेश जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांनी नुकताच दिला. राहुरी तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या घोरपडवाडी ग्रामपंचायतीच्या सन २०२३ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये लोकनियुक्त सरपंच म्हणून मैनाबापू रावसाहेब शेंडगे यांची निवड झालेली होती. त्यांच्या निवडीनंतर मैनाबापू शेंडगे यांनी शासकीय गट नंबर १० मध्ये पत्रा शेड बांधून अतिक्रमण केले. सदरील अतिक्रमणाची नोंद त्यांचे वडील रावसाहेब मारुती शेंडगे यांच्या नावावर आढळून येत आहे.

सरपंच व त्यांचे वडील एकत्रित कुटुंबात राहत असल्याबाबत शिधापत्रिकेचा पुरावा देऊन नगर येथील जिल्हाधिकारी यांचेकडे विवाद अर्ज सादर केला होता. सदरील विवाद अर्जाची गुणवत्तेवर चौकशी पूर्ण होऊन त्यामध्ये सयाजी कारभारी श्रीराम यांच्यावतीने ड. गोरक्ष पालवे यांनी युक्तिवाद केला. त्यामध्ये लोकनियुक्त सरपंच यांच्या वडिलांचे अतिक्रमण असल्याची बाब निष्पन्न झाल्यामुळे सरपंच मैनाबापू शेंडगे यांना अपात्र घोषित करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी यांनी जाहीर केलेला आहे.

अर्जदार सयाजी श्रीराम यांचे वतीने ॲड. गोरक्ष पालवे यांनी युक्तिवाद केला. त्यांना ॲड. गुरविंदर पंजाबी,ॲड.रोहित बुधवंत, ॲड.सागर गर्जे,ॲड.प्रवीण निंबाळकर, ॲड.विवेक बडे,ॲड. धनश्री खेतमाळीस, ॲड.विशाल वांढेकर,ॲड.राहुल दहिफळे, ॲड.पुष्कराज बिडवाई,ॲड.तेजस राख, ॲड.अपेक्षा बोरुडे यांनी सहाय्य केले.

आरोग्य सेविकेची आशा सेविकांना शिवीगाळ

शंकरनगर येथील घटनेची अकलूज पोलिसात तक्रार

माळशिरस ज्ञ प्रतिनिधी

शंकरनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे कामा संबधी निवेदन देण्यासाठी गेलेल्या आशा सेविकांना तेथे उपस्थित असलेल्या आरोग्य सेविकेने विनाकारण शिवीगाळ केल्याची तक्रार अकलूज पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

लाल बावटा आशा वर्कर्स युनियन संघटनेच्या जिल्हाध्यक्षा तथा शंकरनगर प्रथामिक आरोग्य केंद्र याठिकाणी आशा सेविका म्हणून काम करीत असलेल्या रुपाली दोरकर या सकाळी ११ वा. चे सुमारास वैद्यकीय अधिकारी यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी त्या ठिकाणी महाळुंग येथे कार्यरत असलेल्या शमा पठाण -जगताप आल्या. विनाकारण शिवीगाळ करीत अपशब्द वापरून सभासद व संघटना यांच्याबाबत चुकीचे शब्द वापरून संघटनेला बदनाम करण्याचा प्रयत्न केलेला आहे.



विनाकारण शिविगाळ करु नका म्हणल्यावर आपणास मारण्याची धमकी ही दिल्याची फिर्याद रुपाली दोरकर यांनी अकलूज पोलीस ठाण्यात दिली.

त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीसांनी गु.र.नं १६१७/२०२४ इछड कलम ३५२.३५१ (२) ३५१ (३) अन्वये आरोपी विरुध्द अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी आशा सेविका व संघटनेच्या इतर सेविकांनी जिल्हा पोलीस अधिक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनाही प्रत्यक्ष भेटुन झालेला प्रकार सांगितला.यावेळी लाल बावटा आशा व गट प्रवर्तक युनियन लाल बावटा सोलापूर संघटनेच्या राज्य महासचिव कॉ. पुष्पा पाटील व जिल्हा कोषाध्यक्ष कॉ. सिध्दाराम उमराणी व सोलापूर जिल्ह्याच्या अध्यक्ष व तालुक्यातील ईतर आशाताई उपस्थित होत्या.

शिक्षकांच्या कार्योत्तर मान्यता देण्याचे उच्च न्यायालयाचे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना आदेश

सोलापूर । प्रतिनिधी

करमाळा तालुक्यातील श्री दत्त बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थाचालकांनी शाळेच्या स्थापनेपासून शिक्षकांकडून काम करून घेतले परंतु शिक्षण विभागाच्या मान्यता घेतल्या नाहीत. यामुळे उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या शिक्षकांच्या बाजूने न्यायालयाने आदेश देऊन सोलापूर जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांना दोन महिन्यात याचिकेतील शिक्षकांना कार्योत्तर मान्यता देण्याचे कामकाज पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

श्री दत्त बहुउद्देशीय संस्था शेलगाव ता. करमाळा या शैक्षणिक संस्थेअंतर्गत सन २००२ मध्ये श्री अवधूत विद्यालय वांगी नं-२ ही विनाअनुदानित शाळा सुरू करण्यात आली या माध्यमिक शाळेत शिक्षक व शिपाई म्हणून सेवा केलेल्या पाच कर्मचाऱ्यांना संस्थेने सन २००८-०९ मध्ये नियुक्ती देऊन शिक्षण विभागाकडून वैयक्तिक मान्यता घेतल्या. यानंतर या शाळेतील पाच कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विनाअनुदानित काळातील मान्यता मिळाव्यात याकरिता वारंवार शिक्षणाधिकारी व उपसंचालक यांच्या कार्यालयाकडे तक्रारी दिलेल्या होत्या. शिक्षणाधिकारी व उपसंचालक यांनी संस्थेला लेखी आदेश दिलेले असताना संस्थेने शिक्षकांचे कार्योत्तर मान्यता प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवले नाही. यामुळे या शाळेतील शिक्षकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेचा निकाल सन २०१६ मध्ये शिक्षकांच्या बाजूने लागला. उच्च न्यायालयाच्या निकालानंतर देखील शिक्षण विभाग व संस्था यांच्याकडून कार्योतर मान्यता देण्याबाबत दप्तर दिरंगाई करण्यात आली. याचिका कर्त्यांना निरंतर प्रतीक्षेत ठेवण्यात आले. शिक्षण विभागाकडून संस्थेवर कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा अवमान झाल्याने शिक्षकांच्या वतीने उच्च न्यायालयात ऑक्टोबर २०२४ मध्ये अवमान याचिका दाखल करण्यात आली.

२२ नोव्हेंबर २०२४ रोजी उच्च न्यायालय मुंबई यांनी अवमान याचिकेचा निकाल दिला आहे. या निकालात माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी शाळेतील शिक्षक व शिपाई यांच्या कार्योतर मान्यता ६० दिवसात पूर्ण करून देण्याचे आदेश दिले आहेत. अवमान याचिकेवरील सुनावणीत न्यायालयाने संस्था व शिक्षण विभाग यांच्या निष्काळजीपणावर ताशेरे ओढले आहेत व दुसऱ्यांदा न्यायालयाचा अवमान होणार नाही याची खबरदारी घेण्याची तंबी दिली आहे.

शिक्षकांच्या वतीने पुणे येथील ज्येष्ठ विधीज्ञ राजाराम देशमुख यांनी काम पाहिले.

विनाअनुदानित कालावधीत ज्या शिक्षकांनी शाळा चालवली त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी शिक्षक भारती सोलापूरचे प्रयत्न यशस्वी झाले आहेत. संस्थाचालकांकडून कितीही अन्याय झाला तरी न्यायव्यवस्था अन्याय दूर करण्यासाठी सक्षम आहे. उच्च न्यायालयाकडून शिक्षक व शिपाई यांना न्याय मिळाला आहे.



न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी कार्योतर मान्यता देण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

-विजयकुमार गुंड ,जिल्हा प्रवक्ता,शिक्षक भारती सोलापूर

श्री.दत्त जयंतीनिमित्त मरडस गाव येथे भव्य कुस्ती स्पर्धा



गंगाखेड । प्रतिनिधी

मौजे मरडसगाव, तालुका गंगाखेड येथे श्री. दत्त जयंतीनिमित्त भव्य कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पंचक्रोशीतील नामवंत पैलवानांनी सहभाग घेतल्याने कुस्त्या अतिशय रंजक ठरल्या. मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी या स्पर्धांना हजेरी लावली.

स्पर्धेची शेवटची आणि मानाची कुस्ती शेख खाजा आणि नितीन मुंढे यांच्यात खेळवण्यात आली. ती प्रेक्षकांसाठी रोमांचक ठरली. या कुस्तीत शेख खाजा यांनी विजय मिळवला. या मानाच्या कुस्तीचे रोख बक्षीस रु. ५,५५५ हे मा. आ. सिताराम घनदाट यांच्या वतीने प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या वेळी देवस्थानचे महंत दत्तगीरी महाराज, गावचे सरपंच विक्रम काळे, माजी पंचायत समिती सदस्य गंगाधर कांबळे, शरद काळे, नवनाथ जाधव, शिवलिंग व्यवहारे आदी मान्यवर उपस्थित होते.

मयत मुलीच्या नातेवाईकांची शाळा व्यवस्थापनावर कारवाईची मागणी

सातारा । प्रतिनिधी

कन्या शाळा सातारा येथील मैदानावर खेळताना घडलेल्या दुर्घटनेत अक्षता विजय देशमुख (इयत्ता दहावी) या विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याने नातेवाईकांनी शाळा व्यवस्थापनावर गंभीर आरोप करत कारवाईची मागणी केली आहे. शनिवारी अक्षता देशमुख हिच्या नातेवाईकांनी शाळा प्रशासनाला भेटून घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज दाखवण्याचा आग्रह धरला. तसेच घटनास्थळी उपस्थित शिक्षकांना समोर आणून स्पष्टीकरण देण्याची मागणी केली. घटनेवेळी तत्परता दाखवली असती, तर मुलीचा जीव वाचला असता, अशी प्रतिक्रिया नातेवाईकांनी व्यक्त केली.

महर्षी कर्वे शिक्षण संस्थेच्या ऊर्जा व क्रीडा स्पर्धेसाठी अनेक शिक्षक पुण्यात गेले होते. या दरम्यान शाळेच्या मैदानावर कबड्डी सराव सुरू असताना अक्षता देशमुख खेळताना पडली. मात्र, अपघातानंतर शिक्षकांनी वेळेवर उपाययोजना केल्या नाहीत, त्यामुळे उपचारासाठी झालेल्या विलंबामुळे तिचा मृत्यू झाल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

या घटनेमुळे संतप्त नातेवाईकांनी शाळेसमोर गर्दी केली, ज्यामुळे पोलिस फौजफाटा पाचारण करावा लागला. शाळा व्यवस्थापनाने संबंधित शिक्षकांकडून लेखी अहवाल मागवला असून घटनास्थळी चौकशी सुरू असल्याचे सांगितले आहे. संस्थेच्या सचिवांनी याप्रकरणी योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

आपटी नगरीत जयघोषात दत्त जयंती साजरी



जामखेड । प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे यावर्षीही आपटी येथील श्री क्षेत्र विश्वंभर अच्युत दत्तात्रय पादुका देवस्थान येथे मार्गशीर्ष पौर्णिमेनिमित्त श्री दत्त जयंती उत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. सकाळी दत्त महाराजांच्या पादुकांना दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर दत्त महाराजांची पालखी गावातून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. या उत्सवानिमित्त सात दिवस श्रीगुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात शेखर उंद्रे यांच्या सुमधुर प्रवचनाने भक्तांना दत्तमहाराजांचे अनुभव कथन ऐकण्याची संधी मिळाली. त्यांनी मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दत्त जयंतीचे महत्त्व उलगडून सांगितले. दत्त देवतेच्या विविध रूपांचे वर्णन आणि आसुरी शक्तींचा नाश करण्यासाठी झालेल्या दत्तावताराची कथा त्यांनी प्रभावीपणे मांडली. दुपारी १२:३० वाजता दत्त जन्मोत्सवाचा मुख्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. त्यानंतर महाप्रसादाने या भक्तिमय सोहळ्याची सांगता झाली.

शेतकरी मित्रांना कृषि विभागाने सामावून घेवुन मानधान सुरु करावे

तळोधी(बा.) । प्रतिनिधी

कृषी विभाग कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अतंर्गत शेतकरी व कृषीविभाग यांचेतील महत्त्वाचा दुवा म्हणून ओळखला जाणारा शेतकरी मित्र यांना कृषी विभागाने कामावरून कमी करुन शेतकऱ्यांचा आत्माच गायप केल्याने शेतकरी वर्गात कमालीची नाराजी असुन शेतकरी मित्रांची नियुक्ती करुन त्यांना मानधन तत्वावर समावेश करावा असी मागणी जोर धरत आहे.

कृषी विभागांचे आत्मा अतंर्गत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यांतील दोन गावे मिळुन एक शेतकरी मित्रांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर शेतकरी मित्र हे कृषी विभागाचे विविध योजनांची माहिती, व कृषी सहायकांना मदत करण्याचें काम करित असतं. परिणामी शासनाचे विविध योजनांचे लाभ शेतकऱ्यांना मिळण्यास शुलभ होत असे. तसेच पिकाची माहिती देणे, किड रोग व्यवस्थापन, माती परिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, आदी बाबत कृषी विभागाला सहकार्य करण्याचें काम शेतकरी मित्र करीत असत. मात्र अलिकडेच कृषी विभागाने अर्थिक बजेटच्या नावाखाली शेतकरी मित्रांचे मानधन बंद करून कामावरुन कमी केल्याने शेतकरी मित्रात कमालीचा रोष पसरला आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात सदरच्या मुद्यावर आंदोलन करण्याचा इशारा जिल्हा शेतकरी मित्र संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर निर्ब्रट व सचिव राहुल रामटेके दिला आहे.

"कृषि विभाग व शासनाने शेतकरी मित्रांना समावून घेवुन मानधन न दिल्यास हिवाळी अधिवेशनात मोर्चा धरणे आंदोलन करण्यात येईल.
– राहुल रामटेके. जिल्हा सचिव शेतकरी मित्र,संघटना चंद्रपूर

दौंड तालुक्यात संविधान प्रतिकृती तोडफोड प्रकरणी दलित संघटनांचे निषेध आंदोलन

शिरूर । प्रतिनिधी

दौंड तालुक्यात राष्ट्रसंत गाडगेबाबा चौकातील संविधान स्तंभाजवळ दलित संघटनांच्या वतीने संविधानाच्या प्रतीकृती तोडफोडीच्या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. परभणी येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकावर दगडफेक करून संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड झाल्याच्या घटनेचा संताप व्यक्त करत आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात दलित संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी या कृत्याचा निषेध व्यक्त केला. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजासाठी लिहिलेले संविधान हे प्रत्येक भारतीय नागरिकासाठी अभिमानाचे प्रतीक आहे. त्याच्या प्रतीकृतीची तोडफोड जाणीवपूर्वक जातीय द्वेषाने प्रेरित आहे, असे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.



घटनास्थळी जमलेल्या आंदोलकांनी सरकारकडे या घटनेतील समाजकंटकांवर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. तसेच, परभणीतील आंबेडकरी जनतेवर होणारे अन्याय व अत्याचार त्वरित थांबवण्यात यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.आंदोलनकर्त्यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, कोंबिंग ऑपरेशनच्या नावाखाली दलित समाजातील महिलांवर व तरुणांवर होणारी हिंसा थांबवावी. जातीय द्वेषाने प्रेरित घटनेत निष्पाप नागरिकांना लक्ष्य करणे बंद केले पाहिजे.या निषेध आंदोलनाला दलित संघटनांचे पदाधिकारी व भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय समाजाचे आत्माभिमान आहेत. त्यांच्या स्मारकावर किंवा संविधानावर हल्ला हा देशाच्या लोकशाहीवर हल्ला आहे, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले. आंदोलकांनी सरकारकडे दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन न्याय मिळवून द्यावा, असा ठाम इशारा दिला आहे.

हादगाव बु.येथे नवीन स्मशानभूमीचे भूमिपूजन

वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीचा पुढाकार



पाथरी । प्रतिनिधी

हादगाव बु. येथे भविष्यात स्मशानभूमीच्या समस्येला सामोरे जावे लागू नये यासाठी ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून नवीन स्मशानभूमीच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. हा भूमिपूजन सोहळा ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक व पाथरी बाजार समितीचे सभापती अनिलराव नखाते यांच्या हस्ते शनिवारी पार पडला.

ग्रामस्थांना सामाजिक आणि भावनिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रश्नाच्या निराकरणामुळे समाधान व्यक्त करण्यात आले. झिंजाण परिवारासाठी स्वतंत्र स्मशानभूमी ग्रामपंचायतीच्या जनसुविधा योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये सरपंच विभीषण नखाते, ग्रामसेवक के.जी. फंड, चेअरमन बाबासाहेब नखाते, ग्रामपंचायत सदस्य बालासाहेब झिंजाण, बी.टी. कदम, सोसायटी संचालक भगवान झिंजाण, माणिक झिंजाण, संतोष झिंजाण यांसह झिंजाण कुटुंबीय व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हादगाव बु. येथे सध्याच्या स्मशानभूमीची क्षमता अपुरी पडत असल्याने, नवीन स्मशानभूमी उभारण्याचा हा निर्णय ग्रामस्थांसाठी दूरदृष्टीचा ठरला आहे. यामुळे भविष्यात संभाव्य अडचणी टळतील, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

इंदापूर तालुक्यातील शेटफळगढे येथून विवाहित तरुणी बेपत्ता

आढळून आल्यास भिगवण पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन

भिगवण । प्रतिनिधी

इंदापूर तालुक्यातील शेटफळगढे येथून २२ वर्षीय विवाहित तरुणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी भिगवण पोलिस ठाण्यात तरुणीच्या पतीने तक्रार दाखल केली आहे.

बेपत्ता तरुणीची माहिती: बेपत्ता तरुणीचे नाव मेधा उर्फ कोमल तुषार कुंभार (वय २४ वर्षे, रा. रकटेवस्ती, शेटफळगढे, ता. इंदापूर, जि. पुणे) असे आहे. ती शनिवारी (दि. १४) रात्री १२ ते रविवारी (दि. १५) पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान कोणालाही न सांगता घरातून निघून गेली.

तरुणीचे वर्णन
उंची–५ फुट
बांधा–सडपातळ
रंग–गोरा
नाक–सरळ
केस–लांब
चेहरा–उभट
पोशाख–जांभळ्या रंगाचा वनपीस ड्रेस
दागिने–गळ्यात मणीमंगळसूत्र, कानात रिंगा, पायात पैंजण



भाषा–मराठी आणि हिंदी

या संदर्भात भिगवण पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे यांनी माहिती दिली असून, सदर वर्णनाची व्यक्ती आढळल्यास तातडीने खालील क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

संपर्क: भिगवण पोलीस ठाणे:–९५५२१६४१००
सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे:–९४२२१५००५०

सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार कर्चे करीत आहेत.

प्राथमिक शिक्षकांच्या समस्यांसंदर्भात पुरोगामीची सीईओ सोबत बैठक



मुल । प्रतिनिधी

प्राथमिक शिक्षकांच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात एक महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वाखाली विविध शैक्षणिक अधिकारी व शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत, उच्च श्रेणी मुख्याध्यापकांच्या पदोन्नतीचे आदेश सोमवार (दि. १८) रोजी जारी करण्यात येणार असल्याची घोषणा केली. तसेच, केंद्रप्रमुख यांचे सुधारित आदेश देखील सोमवारी दिले जातील, असे ठरविण्यात आले. शैक्षणिक अर्हता वाढविण्याची मंजुरी आणि शैक्षणिक सहलीसाठी परवानगी देण्याचे अधिकार आता पंचायत समितीला देण्यात येणार आहेत. सर्व पदोन्नती संबंधित डीपिसी सभेत मंजूर करून तात्काळ भरण्यात येतील, अशी माहिती देण्यात आली. गटशिक्षणाधिकारी यांना त्रैमासिक सभा आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच, सहा महिन्यांनी शिक्षणाधिकारी यांनी सर्वसामान्य शिक्षकांच्या समस्या निवारण सभा आयोजित करण्याचे निर्देश दिले. आर्थिक प्रश्न आणि निवड श्रेणीसंबंधी सेवानिवृत्त शिक्षकांचे समस्यांचे समाधान लवकरच करण्यात येईल, अशी कबुली शिक्षणाधिकारी अश्विनी सोनवणे यांनी दिली.पुढील बैठक जानेवारी महिन्यात घेण्यात येणार आहे, असे जाहीर करण्यात आले.या बैठकीला पुरोगामी पक्षाचे राज्य नेते विजय भोगेकर, किशोर आनंदवार, सुरेश गिलोरकर, सुनिल कोहपरे, दिवाकर वाघे, गणेश कागदेलवार आणि अन्य शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.